# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ /२६०५१११० ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष ३ ब/क व ड ,वर्ग संस्था निव. कामकाज/ ४१८/२०१६ दिनांक : २१/ ०७ /२०१६

प्रति,
प्रभाग / तालुका , सहकारी निवडणूक अधिकारी (सर्व)

**विषय :-'क' व'ड' प्रवर्गातील सहकारी संस्थांच्या निवडणूका संदर्भातील त्रुटी बाबत..**

आपणास विदित आहेच की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० कलम ७३ क ब(१) नुसार राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका घेण्यासाठी व मतदार याद्या तयार करण्यासाठी अधिक्षण ,निवडणूका व नियंत्रण करण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण गठीत करण्यात आले असुन राज्यातील सहकारी संस्थांच्या निवडणूका सुरळीत व भयमुक्त वातावरणात पार पाडण्याची जबाबदारी प्राधिकरणाची तसेच प्राधिकरणामार्फत नियुक्त करण्यात येणाऱ्या अधिकाऱ्यांची आहे.

तथापि सहकारी संस्थाच्या निवडणूका पार पाडताना विशेषत: 'क' प्रवर्गातील व 'ड' प्रवर्गातील सहकारी संस्थाच्या निवडणूका पार पाडताना खालील गंभीर बाबी निदर्शनास आल्या आहेत.

१. प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी निवडणूकीस पात्र सहकारी संस्थेकडून नमुना ई-२ मध्ये माहिती प्राप्त न झाल्यास महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणूक) नियम २०१४ नियम ५(२) अन्वये कारवाई करीत नाहीत. त्यामुळे अद्यापही अनेक संस्थांच्या निवडणूका मुदतीत होऊ शकल्या नाहीत. व अनेक संस्थांच्या निवडणूका प्रलंबित आहेत. संस्था मतदार यादी प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांना सादर करीत नसल्यास प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी हे मतदार यादी तयार करण्यासाठी प्राधिकृत अधिकारी यांची नेमणूक करीत नाहीत.काही प्रसंगी संस्था कोणत्याही प्रकारे निवडणूक घेण्यासाठी सहकार्य करीत नसल्यास प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी हे निबंधक या नात्याने न्यायोचित कायदेशीर कार्यवाही करीत नाहीत.
२. प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी अपेंडिक्स 'ए' नुसार ई-१ मधील माहिती सादर करीत नाहीत .त्यामुळे वर्षभरात किती निवडणूका घ्यावयाच्या आहेत याचा ताळमेळ लागत नाही.
३. थकबाकीदार सभासदांना थकबाकी भरणे बाबत संस्थेने नोटीस न दिल्याने अशा व्यक्तिचे नाव मतदार यादी मध्ये समाविष्ठ केले जाते या बाबत संबधीत संस्थेचे निबंधक योग्य ती खबरदारी घेत नाहीत.
४. 'ड' प्रवर्ग संस्थेकडून अंतिम मतदार यादी प्राप्त झाल्यानंतर संबधित प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी अंतिम मतदार यादी प्रमाणित करण्याकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करीत आहेत.
५. प्राधिकृत अधिकाऱ्याची नियुक्ती होऊनही प्राधिकृत अधिकारी याना नियुक्ती आदेश बजावण्यात येत नाही. व नियुक्ती आदेशाबरोबर प्रमाणित केलेली अंतिम मतदार यादी , उपविधीची प्रत व निवडणूक निधी सुपुर्द केले जात नाही. प्राधिकृत अधिकारी यांना निवडणूक घेणेबाबत आदेश प्राप्त होऊनही अधिमंडळाच्या विशेष सभेची नोटीस ते वेळेत काढीत नाहीत तसेच अशी नोटीस जरी काढली तरी काही प्रसंगी अचानकपणे सभेची जागा परस्पर बदलली जाते. प्रभाग /तालुका , सहकारी निवडणूक अधिकारी या प्रक्रियेवर लक्ष ठेवत नाहीत.
६. प्राधिकृत अधिकारी यांचेकडुन निवणूक निकाल , हिशोब प्राप्त करुन घेतला जात नाही.या बाबत आढावा घेतला जात नाही. तसेच निकाल प्राप्त झाला तरी अधिसूचना काढणे , पदाधिकाऱ्याची निवडणूक घेणे ,याबाबत पाठपुरावा केला जात नाही. प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांच्या दुर्लक्षितपणामुळे काही संस्थांच्या समिती गठीत न होताच अशा संस्थांचे प्राधिकृत अधिकारी परस्पर पदाधिकाऱ्याची निवड करताना निदर्शनास आले आहे.त्यामुळे कायदेशीर क्लिष्टता निर्माण होत आहे.

७. 'ड' प्रवर्ग संस्थांच्या निवडणूकीच्या वस्तुस्थिती बाबत प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी आढावा घेत नसल्याने बऱ्याच संस्थांचे हिशोब अपूर्ण राहिलेले आहेत . त्यामुळे या रकमा खर्च होउनही प्राधिकरणाचे खात्यावर मोठया प्रमाणावर शिल्लक दिसत आहेत.

८. प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी परस्पर 'ड' प्रवर्गातील सहकारी संस्थांचे प्राधिकृत अधिकाऱ्याचा अहवाल प्राप्त न होताच सदर संस्थांच्या निवडणूका 'क' प्रवर्गाप्रमाणे घेत आहेत.

९. क' प्रवर्गातील सहकारी संस्थाच्या निवडणूका घेत असताना मतदार यादी ,निवडणूक निधी ,संस्थेचे उपविधी प्राप्त करुन न घेताच निवडणूक निर्णय अधिकारी यांची नियुक्ती केली जाते . त्यामुळे या संस्थांच्या वेळेत व महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक ) नियम २०१४ नियम ७५ प्रमाणे पार पाडल्या जात नाहीत. तसेच निवडणूक प्रक्रिया पार पाडली जात असताना मंजुर केलेला कार्यक्रम नियम ७५ (२) क प्रमाणे असल्याचे दिसून येत नाही.

१०. बरेच प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी 'क' प्रवर्गातील सहकारी संस्था असून सुध्दा त्या संस्थेचा 'ड' प्रवर्गातील संस्थेप्रमाणे कृती कार्यक्रम प्राधिकरणाकडून मंजुर करुन घेतात ही बाब प्राधिकरणाची दिशाभूल करणारी असून गंभीर स्वरुपाची आहे.

११. प्राधिकरणाने निवडणूकीच्या सद्यस्थिती बाबत व जमाखर्चाच्या हिशोबा बाबत मागविलेली माहिती वेळेवर सादर केली जात नाही.

१२. उमेदवाराची अनामत रक्कम नियमातील तरतुदी प्रमाणे त्यांना परत करण्यात येत नाही.

१३. उमेदवाराची जप्त अनामत प्राधिकरणाचे खात्यात वेळेवर भरणा केला जात नाही.

१४.मंजूर मर्यादेपेक्षा जास्त झालेले खर्च मंजूरीसाठी प्राधिकरणाकडे न पाठविता प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी,जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी,परस्पर मंजूर करीत आहेत.

१५.प्राधिकृत अधिकारी याना निवडणूकी संबधात योग्य ते मार्गदर्शन केले जात नाही. तसेच अधिनियम , नियमातील तरतुदी स्वयंस्पष्ट असताना प्राधिकरणाकडे मार्गदर्शनार्थ पत्रव्यवहार करुन कालापव्यय केला जात आहे.

१६. बहुतांशी गृहनिर्माण संस्था नविन कायदयातील निवडणूक विषयक तरतूदींबाबत अनभिज्ञ आहेत.प्रभाग अधिकारी संबंधित संस्थांचे निबंधक या नात्याने अशा संस्थांना मार्गदर्शन करीत नाहीत.

वरील सर्व निरिक्षणे निवडणूकी सारख्या संवेदनशील बाबीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष होत असल्याच्या निदर्शक आहेत.सहकारी संस्थांच्या निवडणूकांना घटनात्मक स्वरुप तसेच वैधानिक स्वरुप असताना निवडणूकांबाबत आवश्यक ते गांर्भीय घेतले जात असताना दिसून येत नाही. निवडणूकीच्या कामास किती व कसे प्राथम्य देणे आवश्यक असावे हे वेगळे विशद करण्याची आवश्यकता नसावी.

प्राधिकरणाने या बाबत धोरण निश्चित करुन वेळोवेळी सर्व संबंधितास आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत.या सर्व बाबी बाबत प्राधिकरणाने वेळोवेळी आदेश ,परीपत्रके, मार्गदर्शक सूचना , खुलासे निर्गमित केली आहेत.तरीही काही प्रभाग /तालुका सहकारी निवडणूक अधिकारी यांचे कडुन जाणीवपुर्वक उपरोक्त बाबीची पुनरावृत्ती होत आहे.

या पत्राद्वारे पुन:सुचित करण्यात येत आहे की , निवडणूकी सारख्या संवेदनशील बाबी मध्ये उपरोक्त कृत्ये घडल्यास अथवा अवैधानिक कृत्ये घडल्यास किंवा निवडणूक घेताना बेपर्वावृत्ती व, बेकायदेशीर कृती दिसून आल्यास अशा प्रभाग /तालुका सहकारी निवडणुक अधिकारी यांच्या विरुध्द भारतीय दंड संहिता अन्वये कारवाई करण्याशिवाय प्राधिकरणास पर्याय राहणार नाही, याची कृपया सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

(मधुकर चौधरी)
आयुक्त
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत माहितीस्तव:-**

१.सर्व जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी

२. विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था मुंबई विभाग, मुंबई